# प्राणिप्रेमातून गवसलं आयुष्याचं ध्येय

*एक शहरी मुलगा प्राण्यांमध्येच आपलं मैत्र शोधतो, त्यांच्यातच राहतो आणि त्यांच्यावर प्रेम करतो, हे खरं वाटत नाही ना? पण या प्राणिप्रेमातूनच त्याला आयुष्याचं ध्येय गवसलं आणि त्या दृष्टीनं तो अभ्यास आणि काम करू लागला. स्थानिक पशुधनवाढीसाठी त्याचे सुरू असलेले प्रयत्न वाखाणण्यासारखे आहेत.* ***'अनवट वाटेवरचे वाटसरू'*** *या सदरात आज पाहू या हे वेगळं काम करणाऱ्या* ***सजल कुलकर्णी*** *या तरुणाविषयी...*

---

मासवण या आदिवासी भागात मी काम करत असताना जवळपास सगळ्यांच्या घरात कोंबडी, बकरी, मांजर, कुत्रा असे प्राणी पाळलेले बघायला मिळत. घरातली लहान मुलं आणि हे सगळे प्राणी आपसांत खेळत, हितगुज करत. प्राण्यांसाठी राहण्याचं वेगळं ठिकाण नव्हतंच. त्यांचाही घरात तितकाच मनमोकळा वावर होता आणि त्यांना कुठेही फिरायला मज्जाव नव्हता. आज शहरीकरणामुळे फ्लॅट पद्धतीत जिथं जास्त माणसंच सामावू शकत नाहीत, तिथं अशा पाळीव प्राण्यांचा विचार करणं कठीणच गोष्ट आहे. मुलांना शाळेतल्या पोस्टरवरून हम्मा, गाय, कुकू, माऊ असं दाखवून शिकवलं जाण्याचे दिवस आलेत. असं वातावरण असतानाच आपल्यातलाच एक शहरी मुलगा प्राण्यांमध्येच आपलं मैत्र शोधतो, त्यांच्यातच राहतो आणि त्यांच्यावर प्रेम करतो, हे खरं वाटत नाही ना? या मुलाचं लहानपण गोठ्यात खेळण्यात गेलं. त्याच्या आई-वडिलांनी कधी त्याला 'हात-पाय घाण होतील, जनावरं लाथा मारतील' अशी भीती घातली नाही. या मुलाचं प्राणिप्रेम इतकं, की एके दिवशी हे महाशय चक्क म्हशीवर बसून शाळेत गेले. जणू काही ती म्हैस त्याच्यासाठी हत्तीची भूमिका निभावत होती आणि हा अंबारीतून मिरवणूक निघाल्याचा आनंद लुटत होता.

सजल कुलकर्णी या तरुणाचा प्रवास प्राणिप्रेमातून आयुष्याच्या ध्येयापर्यंत कसा पोहोचला, हे बघण्याकरिता त्याच्याबद्दल थोडं जाणून घ्यावं लागेल. सजल बायोटेक्नॉलॉजीचा पदवीधर असून, तो 'बायफ' या संस्थेत संशोधन अधिकारी म्हणून कार्यरत आहे. तो डॉक्टरेटदेखील करतो आहे. केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र पशुमंत्री असायला हवा, अशी मागणीही त्यानं केली आहे. सजलला त्याच्या कामाबद्दल, संशोधनाबद्दल 'युवा संशोधक'सह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अर्थातच त्याला या पुरस्कारांचा कुठलाही दंभ नाही. तो आपलं काम करत पुढे चालतो आहे.

लहान असल्यापासून घरात गायी, कुत्री, पोपट असे पशु-पक्षी पाळलेले असल्यामुळे मोठं झाल्यावर आपण याच विषयावर म्हणजे प्राण्यांचाच अभ्यास करायचा, असं न कळत्या वयात सजलला वाटायचं. शिकत असताना बारावीनंतर डॉक्टर, इंजिनीअर न होता आपण व्हेटर्नरी डॉक्टर (प्राण्यांचं डॉक्टर) व्हायचं, असं सजलनं ठरवलं. मग काय, लागला गडी अभ्यासाला. मुक्या प्राण्यांवरचं प्रेम त्याला या विषयांकडे ओढत होतं. आपण पशुवैद्यकीय शिक्षण घेतलं, तर आपल्याला प्राण्यांची शास्त्रशुद्ध पद्धतीने काळजी कशी घ्यायची, त्यांना काही दुखलंखुपलं तर त्यांच्यावर कोणते उपचार करायचे, हे कळेल, हेच विचार त्याच्या मनात घोळत होते.



बारावीचा निकाल लागला आणि अवघे पाच गुण कमी पडल्यानं सजलला 'व्हेटर्नरी'ला प्रवेश नाकारला गेला. आता पुढे काय करावं हेच त्याला कळेनासं झालं. त्याला दुसरं काहीही करायचं नव्हतं आणि आता तर सगळे रस्ते बंद झाल्यासारखी अवस्था झाली होती. आसपासचे सगळे जण इतर शाखेत प्रवेश घेण्यासंबंधी सल्ले देत होते; पण सजलची मनाची तयारी होत नव्हती. अशा वेळी जैवतंत्रज्ञान या शाखेत आपल्याला संशोधनाची अधिक संधी आहे ही गोष्ट लक्षात येताच सजलनं नागपूरच्या आंबेडकर महाविद्यालयात प्रवेश घेतला.

खरं तर सजलला बायोटेक्नॉलॉजी म्हणजे काय हेही नीटसं ठाऊक नव्हतं. मग सुरुवात झाली ती त्यातले वेगवेगळे विषय समजून घेणं आणि ते ते विषय कुठेकुठे उपयोगी पडतात तेही जाणून घेण्यापासून. प्रॅक्टिकल करतानाही खऱ्या रोजच्या जगण्यात याचा कुठे आणि कसा उपयोग करता येईल याचाच विचार त्याच्या डोक्यात घोळत असे. अभ्यासात रस घेण्याचा प्रयत्न केला, तरी अभ्यासक्रमातला रुक्षपणा नकोसा वाटे. त्या नीरस पद्धतीच्या अभ्यासक्रमामुळे विषय नीट कळतही नसे. जायचं तर याच वाटेनं होतं; पण वाटचाल सुरळीत चालू नव्हती.

त्यातच एके दिवशी सजलला डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या 'निर्माण' या उपक्रमाची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. आपण या उपक्रमात सहभागी व्हायचं त्यानं कुतुहलापोटी ठरवलं. हा दोन वर्षांचा सहा-सहा महिन्यांच्या



अंतरानं होणाऱ्या चार शिबिरांचा प्रवास त्याला खूपच विलक्षण वाटला. 'मी'पासून 'समाजा'पर्यंत पोहोचण्याचा तो मार्ग होता. सजलनं आपलं कुटुंब, आपले मित्र आणि आपले नातेवाईक या जगापेक्षा दुसरा विचारच आतापर्यंत कधी केला नव्हता. तसंच 'मी' म्हणजे काय याचाही विचार त्यानं कधी गंभीरपणे केला नव्हता. 'निर्माण'मध्ये प्रवेश करताच या 'मी'नं त्याला अंतर्मुख केलं. आपण कोण आहोत, काय आहोत, आपल्याला काय करायचंय, आपल्या आजूबाजूचं जग कसं आहे, अशा सगळ्या गोष्टींचे प्रश्नच सजलच्या मनाला पडू लागले. या प्रश्नांच्या शोधात निघालेल्या सजलला स्वतःबद्दलची स्पष्टता येत गेली. आपल्यात कोणत्या क्षमता आहेत, कोणत्या मर्यादा आहेत, या गोष्टी त्याला प्रथमच लक्षात



आल्या. क्षमतांचा वापर कसा करायचा आणि मर्यादांवर मात कशी करायची याबद्दलचे विचार मग मनात सुरू झाले. सजलमधले हे सकारात्मक बदल घरच्यांनाही जाणवू लागले.

निर्माण उपक्रमानं फेलोशिप जाहीर केली होती. एक वर्ष आपल्या शिक्षणाचा उपयोग करून आपल्या आवडीचं काम करून समाजाचे प्रश्नल सोडवण्यासाठी तळापर्यंत पोहोचायचं सजलनं ठरवलं. सजलनं 'बायफ' या उरुळीकांचन इथं असलेल्या मध्यवर्ती संशोधन केंद्रात पशुसंवर्धनाविषयीची (Semen freezing activity quality testing) फेलोशिप करायचं ठरवलं. दुसरीकडे त्यानं नागपूरच्या डॉ. आंबेडकर महाविद्यालयातून विज्ञान शाखेतली जैवतंत्रज्ञानाची पदवीही प्राप्त केली.

'बायफ' ही संस्था गांधीजींचे अनुयायी मणिभाई देसाई यांनी पुण्याजवळ उरुळीकांचनमध्ये १९७३ साली स्थापन केली. गांधीजींनी मणिभाईंवर तिथल्या निसर्गोपचार केंद्राचीही जबाबदारी सोपवली. त्या वेळी उरुळीकांचन हे गाव दुष्काळ आणि गरिबी यांनी ग्रासलेलं होतं. गोपालनातून आर्थिक उन्नती कशी होऊ शकेल, याच एका विचारानं मणिभाईंना झपाटलं. या झपाटलेपणातूनच 'बायफ' या संस्थेचा जन्म झाला. उरुळीकांचनमध्ये सुरुवातीला देशी गायींचं पालन आणि संवर्धन होत असे; पण नंतर असं लक्षात आलं, की देशी गायींच्या दुग्धोत्पादनात वाढ करण्यासाठी काही तरी प्रयत्न करायला पाहिजेत. मग मणिभाईंनी भरपूर दूध देणाऱ्या गायींच्या प्रजाती विदेशातून उरुळीकांचनला आणल्या. त्या गायींचा संकर करून त्यांनी आपल्या शेतकऱ्यांना जास्त दूध देणाऱ्या गायी मिळवून दिल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होऊ लागला. संकर होण्याच्या प्रक्रियेसाठी कृत्रिम पद्धतीनं रेतन करणं आवश्यक होतं; पण त्याचबरोबर वेगवेगळया अवस्थेतून जाणाऱ्या प्रयोगशाळेचीही आवश्यकता होती. मणिभाईंनी तिचीही उभारणी केली. आज या प्रयोगशाळेमध्ये उत्कृष्ट वंशावळीच्या शुद्ध जातींच्या वळूंचं वीर्य गोठीत करून शेतकऱ्यांकडल्या गायींना कृत्रिम रेतनाद्वारे गर्भधारणा केली जाते. त्यामुळे या गायींच्या पोटी चांगली वासरं जन्माला येतात आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. आज उरुळीकांचन हा गरिबीनं ग्रासलेला भाग राहिला नसून, मणिभाईंच्या प्रयत्नांमुळे आणि परिश्रमामुळे तो सधन शेतकऱ्यांचा भाग म्हणून ओळखला जातो. हे सगळं घडलं 'बायफ' या संस्थेमुळे!

सजलनं उरुळीकांचनला आल्यानंतर लगेचच आपल्या संशोधनकार्याला सुरुवात केली. आसपास असलेली शेतकऱ्यांची घरं त्याला आपलीशी वाटू लागली. त्या त्या घरातल्या जनावरांशी त्याची दोस्ती झाली, इतकी की काही वेळा त्या शेतकऱ्याला दूध काढायला त्याचीच गाय हात लावू देत नसे; पण सजलचा स्पर्श होताच ती निमूटपणे त्याला दूध काढण्यासाठी

परवानगीच देत असे. सजल उरुळीकांचनच्या गोठ्यांमध्ये रमला. इथल्या प्रयोगशाळेत त्यानं वळूच्या वीर्यतपासणीवरून वळूची गुणवत्ता तपासायला सुरुवात केली. त्यात त्यानं स्ट्रेस टेस्ट, रिॲक्टिव्हिटी टेस्ट, क्रोमॅटिन डॅमेज ॲसे अशा टप्प्यांतून अभ्यास केला.

आपल्या देशात देशी जनावरांची म्हणजेच गायी आणि बैल यांची उत्पादकता वाढवण्यासाठी विदेशी वाण आणून नवी संकरित पिढी तयार केली जाते. सजलला या 'आर्टिफिशियल इन्सेमिनेशन'चं आणि कृत्रिम बीजधारणेचं म्हणजेच संकरित जनावरांच्या पुनरुत्पादनाचं आणि संवर्धनाचं तंत्रज्ञान कसं असतं, याचं शिक्षण उरुळीकांचनच्या प्रयोगशाळेत मिळालं. आपल्याकडली देशी जातींची जनावरं स्थानिक आणि भौगोलिक परिस्थितीशी जुळवून घेतात. त्यांना त्या त्या ठिकाणी कसं जगायचं, आहे त्या बदलत्या परिस्थितीत तग धरून कसं राहायचं हे शिकवावं लागत नाही. तसंच शेतकऱ्यांना असलेल्या जनावरं पाळण्याच्या अनेक पिढ्यांच्या अनुभवामुळे त्या वाणाची पुरेशी माहिती असते. विदेशी जनावरांच्या बाबतीत मात्र त्यांना वेगळ्या वातावरणात तग धरून राहणं कठीण जातं. या सगळ्या प्रयोगांचा आनंद त्याला रोजच वेगळ्या तऱ्हेनं मिळत होता.



सजल नागपूरमध्ये राहून काम करतो. नागपूर शहराला रोज वीस ते पंचवीस लाख लिटर दूध लागतं आणि संपूर्ण विदर्भातले अकरा जिल्हे मिळून जेमतेम सव्वाआठ लाख लिटर दुधाची गंगा वाहते. गंमत म्हणजे तिथल्या स्थानिक गायींचं वाण कुठलं आहे, त्यांची नावं काय आहेत, त्यांच्या क्षमता काय आहेत याविषयी कुठलीही माहिती उपलब्ध नव्हती. केवळ शंभर म्हशी खरेदी करतो म्हणणं आणि एक डेअरी चालवतो म्हटल्यानं पुरेसं ज्ञान मिळत नाही. हे सगळं लोकांचं अज्ञान पाहून सजल कंबर कसून कामाला लागला. सध्या तो विदर्भातल्या गावरान गायींचं वर्गीकरण करतो आहे. सतत आदिवासी भागांत, खेड्यापाड्यात ऊनपावसाची पर्वा न करता फिरतो आहे. त्यांच्यात राहतो आहे, त्यांच्याशी संवाद साधतो आहे. यातून त्याला खूप महत्त्वपूर्ण माहिती मिळते आहे. आदिवासी, गोवारी आणि कामाठी यांचं परंपरागत पशुधन काय आहे, ही मंडळी कुठली कामं किती करतात, त्यांच्याजवळच्या गायी-म्हशी किती दूध देतात, त्यांना कुठले आजार होतात, अशा वेळी हे

लोक आपल्या प्राण्यांवर कोणते उपचार करतात, लोकसंस्कृतीमध्ये या पशूंचं स्थान काय आहे, अशा अनेक मुद्द्यांवर सजलचा अभ्यास सुरू आहे.

लवकरच त्याचा हा अभ्यास (डिसेंबर २०१७) पूर्ण होणार असून, 'नॅशनल ब्यूरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिर्सोसेस' या संस्थेमार्फत विदर्भातल्या गायी-बैलांची ओळख करून देण्याचा त्याचा प्रयत्न सफल होण्याच्या मार्गावर आहे. सजलच्या प्रयत्नांमधून विदर्भातल्या गायी-वासरांची सरकारपातळीवर दखल घेतली जाऊ शकेल. या सगळया प्रयत्नांमुळे जनावरांच्या संवर्धनाचा, आणि पुरेसं स्थानिक पशुधनवाढीचा मार्ग आणखी विस्तारित होऊ शकेल.

शोध सुरू असताना सजलला विदर्भात काही गायी दिसल्या. इतर गायींपेक्षा त्या वेगळया असल्याचं त्याला जाणवलं. तशा प्रकारच्या गायी कुठे कुठे आहेत आणि त्यांना काय नावानं ओळखलं जातं, याचा छडा लावण्यासाठी तो जंग जंग फिरला. जी गाय आतापर्यंत 'गावरान' याच नावाखाली ओळखली जायची; पण ती एक वेगळी जात आहे हे त्याच्या लक्षात आलं. पूर्व विदर्भामध्ये गौंड आदिवासींच्या गावांमध्ये एकसारख्या दिसणाऱ्या गायी आढळतात. परंतु त्यांची सरकारदरबारी नोंद होताना मात्र 'गावरान' या एकाच गटात केलेली दिसून येते; मात्र प्रत्यक्षात सजलनं आदिवासींशी सातत्यानं संवाद साधल्यावर त्याच्या असं लक्षात आलं, की या गायी गावरान गायींपेक्षा वेगळया आहेत. आणि मग यांची जात वेगळी म्हणजे नेमकी कुठली याचा शोध सुरू झाला. तेव्हा त्यानं संयुक्त राष्ट्रांची फूड अँड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन (एफएओ), तसंच भारतातल्या 'नॅशनल ब्यूरो ऑफ ॲनिमल जेनेटिक रिसोर्सेस' यांनी जी पद्धत सांगितलेली होती, ती वापरून या गायींच्या प्रजातीचा जास्त अभ्यास सुरू केला. या पद्धतीवरून एखाद्या भागातल्या पशूंची विशिष्ट प्रजाती आहे की नाही हे समजू शकतं. ती पद्धत वापरल्यावर या गायी गावरान नसून त्या वेगळयाच जातीच्या आहेत हे सजलच्या लक्षात आलं. त्या गायींच्या गुणवत्ता तपासणीचं काम सजलनं हाती घेतलं आणि शास्त्रीय पद्धत वापरून सजलनं विदर्भातल्या गायींची 'कठानी' ही जात शोधून काढली आणि आपलं म्हणणं सिद्ध करून दाखवलं.

या संदर्भातला शोधनिबंध (शोधनिबंधाचा विषय - मॅनेजमेंट अँड फिजिकल फीचर्स ऑफ ट्रायबल कठानी कॅटल इन विदर्भ) 'इंडियन जर्नल ऑफ ॲनिमल सायन्स' या प्रतिष्ठित आणि मानाच्या समजल्या जाणाऱ्या जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला. त्यानंतर लगेचच 'इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिया ऑफ लाइव्हस्टॉक' यांनी सजलच्या या शोधाची माहिती कळताच त्याच्याशी संपर्क साधला आणि या संदर्भात माहिती विचारून त्याच्या या शोधाची दखल घेतली आहे.

सजलला कविता (विशेषतः ग्रेस आणि सुरेश भट यांच्या) आणि गाणी आवडतात, त्याला संगीत आवडतं आणि नाटकंही आवडतात. वेळ मिळाला, की या गोष्टी त्याला ताजंतवानं करतात. सजल जसा पशुवेडा आहे, तसाच तो जंगलवेडाही आहे. त्याला जंगलात भटकंती करायला आवडतं. सजलनं पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांच्याबरोबर मेंढा गावाच्या वनसंपत्तीचं मोजमाप करण्यासाठी काम केलं. त्यांना साहाय्य करताना खूप शिकायला मिळाल्याचं तो सांगतो. जंगलांचं संवर्धन व्हावं, यासाठी पूर्वजांनी देवराया निर्माण केल्या, त्यांची जपणूक व्हावी, स्थानिक पशुधनाची वाढ व्हावी, ठिकठिकाणी विकेंद्रित पशुसंशोधन संवर्धन केंद्रं निर्माण व्हावीत, स्थानिक पशूंचं गुणबीज जपणाऱ्या 'जर्मप्लाझम' बँका निर्माण व्हाव्यात असं सजलला वाटतं आणि ते होण्यासाठी तो प्रयत्नशील आहे.

जगात सगळ्यात जास्त पशूंची संख्या भारतात असून, उत्पन्नाच्या दृष्टीनंही आपण पशूंचा काहीच उपयोग करत नाही, असं सजलला वाटतं. भारतीय उपखंडात शेती आणि पशुपालन हे व्यवसाय परस्परांवर अवलंबून आहेत. यात स्थानिक जनावरांच्या जातीला खूप मोलाचं स्थान आहे. जैवविविधता संवर्धनात स्थानिक पशूंच्या जाती हा विषय खूप कळीचा आहे. या जाती तयार होण्यात त्या त्या ठिकाणच्या स्थानिक लोकांची भूमिका महत्त्वाची समजली जाते. ही मंडळी या जातींचं जतन करतात किंवा संकर करून त्या वाढवतात. खऱ्या अर्थानं ही मंडळी जनुकरक्षक आहेत. त्यामुळे अशा जाती शोधून काढणं आवश्यक आहे असं सजलला वाटतं आणि तो याच कामात मग्न आहे.



सजलला भविष्यात विदर्भातल्या स्थानिक गायींच्या प्रजातींचं संवर्धन आणि संशोधन यावर काम करायचं आहे. तसंच विदर्भातल्या जैवविविधतेचा अभ्यास आणि संवर्धनासाठी



प्रयत्न करायचे आहेत. आज भारत जागतिकीकरणाच्या भूलभुलैयात अडकत चालला आहे. चमको आणि 'यूज अँड थ्रो' संस्कृतीनं माणसांवर अतिक्रमण केलं आहे. व्यक्तिकेंद्रित समाज आपल्याच कोषात मग्न होत चालला आहे. अशा परिस्थितीत मुळातच असलेली गरीब-श्रीमंत दरी आणखीच वाढत चालली आहे. ही दरी दूर कशी करता येईल हा विचार युवांनी करायची आवश्यकता असल्याचं सजलला वाटतं. गरिबी दूर झाली, तरच आपण शाश्वत विकासाच्या दिशेनं वाटचाल करत असू, असंही त्याला ठामपणे वाटतं.

**शब्दांकन: दीपा देशमुख**

सजल कुलकर्णी
डॉ. मेरज सय्यद

# पशुपालक : जनुकांचे रक्षक

**भारतीय उपखंडात शेती आणि पशुपालन हे परस्परांवर अवलंबून आहेत. त्यातूनच त्यांचा सामाईक विकास झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतीला पूरक (बैलजोडी), शेतीला पुरवठा करणारे (धनगर, गवळी) आणि शेतीवर अवलंबून (डेअरी, पोल्ट्री) असे तीन भाग ढोबळमानाने दिसतात. यामध्ये जनावरांच्या स्थानिक जातींचे विशेष महत्त्व आहे. जैवविविधता संवर्धनात स्थानिक पशूंच्या जाती हा जागतिक स्तरावर कळीचा मुद्दा मानला जातो. एकट्या भारतात एकंदर पशूंच्या दीडशेपेक्षा जास्त जाती आढळतात. या जाती तयार होण्यामध्ये तिथल्या लोकसमूहांची भूमिका महत्त्वाची असते. ते या स्थानिक जाती सांभाळतात, त्या तयार करतात (संकर) आणि त्यांना या जातींबद्दल अगाध ज्ञान आहे. ते केवळ पशुपालक नाहीत, तर ते खऱ्या अर्थाने जनुकरक्षक आहेत. आपल्याकडील जनावरांच्या स्थानिक जाती हुडकणे आणि त्यांचे पालन करणाऱ्या समूहांचे ज्ञान विकसित करणे, त्यांच्या मूल्यवर्धित उत्पादनांसाठी बाजारपेठ विकसित करणे हाच शाश्वत विकास ठरेल.**


सजल कुलकर्णी

एप्रिल महिन्यातली टळटळीत दुपार. ऊन आग ओकत होते. राजाबाई भेटली. राजाबाई राठोड, बाळंतवाडी तांडा, तालुका कंधार जिल्हा नांदेड. पूर्वी माळेगावच्या यात्रेवेळी तिला भेटलो होतो. भर उन्हाळ्यात हिच्याकडे शंभर गायींचा कळप. सगळ्या लाल कंधारी. दुष्काळामुळे टँकरचे पाणी विकत घेऊन जनावरे जगवली. कडबा अठरा रुपये पेंडी होता. आता भेटल्यावर परत बोललो तर म्हणाली, की दुष्काळात एक पण गाय व्यायली नाही, त्यामुळे निभले. आता तीसेक गायी व्यायल्या. कसे ते विचारल्यावर म्हणाली, की मागच्या हंगामात गाभा नाही जाऊ दिल्या, गोऱ्ह्याला पोते बांधले, एक पण गाय गाभ जाऊ दिली नाही. आता सुगीत वासरे आंग धरतात, उन्हाळा येईस्तोवर मोठे होतात, मग घोर नाही. अशा गाभा जाऊ दिल्या, की त्या गणपतीच्या वेळेला व्यायला येतील आणि झाले तसेच. गणपतीनंतर तिच्या कळपात १२७ जनावरे झाली. एकूण ३१ गायी व्यायल्या होत्या. अजून खोलात जाऊन विचारले, तर म्हणाली, की गेल्या तीन वर्षांपासून करतेय असं.

दुसरे उदाहरण शालनबाई निमसरकर. गडचिरोली जिल्ह्यातल्या अनखोडा (तालुका चामोर्शी) इथली ही ७० बेरारी शेळ्यांची मालकीण. मुलींची लग्ने, मुलाचे शिक्षण या शेळ्यांच्याच भरोश्यावर केले. जोडीला अडीच एकर धानाची शेती. बेरारी म्हणजे तिच्या भाषेत लाख्या. ती म्हणाली, क्की लाख्या बकऱ्या जास्त पावसात, जास्त उन्हात जगतात. तिच्यावर गोचीड कमी असतात. बारकाईने बघितले तर निरनिराळ्या प्रदेशात- तिथल्या भूगोल आणि हवामानाला अनुरूप- जनावरांच्या स्थानिक जाती दिसतात. आणि निसर्गातून मिळालेल्या ज्ञानाच्या आणि परंपरेने बहाल केलेल्या शहाणपणाच्या बळावर निगुतीने त्यांचे शाश्वत संगोपन, संवर्धन करणारे असे अनेक पडद्यामागचे कलाकार आपापल्या ठिकाणी काम करताना दिसतात. कुठल्याही मदतीशिवाय, अपेक्षेशिवाय, शाबासकीशिवाय...

पशुपालन हे प्राचीन काळापासून शेतीला पूरक असे क्षेत्र आहे, नव्हे तर तो शेतीचा कणा आहे. यामुळेच जैवविविधता संवर्धनात स्थानिक पशूंच्या जाती हा जागतिक स्तरावर कळीचा मुद्दा मानला जातो. एकट्या भारताचा विचार केला तर एकंदर पशूंच्या दीडशेपेक्षा जास्त जाती आढळतात. त्यांच्या अनेक पैलूंचा संबंध हा त्या जाती पाळणाऱ्या लोकसमूहांशी जोडता येतो. भारतीय उपखंडात शेती आणि पशुपालन हे परस्परांवर अवलंबून आहेत. त्यातूनच त्यांचा सामाईक विकास झाला आहे. यामध्ये प्रामुख्यानं शेतीला पूरक (बैलजोडी), शेतीला पुरवठा करणारे (धनगर, गवळी) आणि शेतीवर अवलंबून (डेअरी, पोल्ट्री) असे तीन भाग ढोबळमानाने दिसतात. यामध्ये जनावरांच्या स्थानिक जातींचं विशेष महत्त्व आहे. या जाती तयार होण्यामध्ये तिथल्या लोकसमूहांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसून येते. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तरी धनगर, नंदा गवळी, माना आदिवासी, पावरा आदिवासी, गोलकर, कानडी हिंदू तलवार, बंजारा, ऊंराव अशी अनेक मंडळी सहज दिसतील. हे लोक जे काम करत आहेत, ते जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय मूलभूत आणि मोलाचे काम आहे. ते या स्थानिक जाती सांभाळतात,

| जनावरांची जात | पाळणारे लोकसमूह | प्रदेश |
|---|---|---|
| दख्खनी मेंढी | धनगर | दख्खनचा प्रदेश |
| गौळाऊ गाय | नंदा गवळी | विदर्भ प्रदेश |
| बेरारी शेळ्या | माना आदिवासी | विदर्भ प्रदेश |
| सातपुड्यातील कोंबडी | पावरा आदिवासी | सातपुडा प्रदेश |
| शाही म्हैस | गोलकर | गोंडवन प्रदेश |
| डांगी गाय | कानडी हिंदू तलवार | सह्याद्री प्रदेश |
| लाल कंधारी गाय | बंजारा (चित्तोडगढ) | मराठवाडा प्रदेश |
| स्थानिक डुक्कर | ऊंराव आदिवासी | गोंडवन प्रदेश |



त्या तयार करतात (संकर) आणि त्यांना या जातींबद्दल अगाध ज्ञान आहे. ते केवळ पशुपालक नाहीत तर ते खऱ्या अर्थाने जनुकरक्षक आहेत.

या जाती पाळणाऱ्या लोकांचे या जातींविषयीचे ज्ञान हे अनुभवातून विकसित झाले आहे. जनावरांची जात विचारल्यावर हे लोकसमूह यांचा देशी किंवा गावरान असाच उल्लेख करतात. त्या त्या प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, माती, झाडाझाडोरा यावर या जाती, त्यांची उत्पादकता, प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याची क्षमता, पुनरुत्पादन इत्यादी अवलंबून आहे, त्यामुळेच प्रदेशाप्रमाणे आणि गरजेप्रमाणे जातींमध्ये विविधता आढळते. दुर्दैवाने या विविधतेची दखल हवी त्या प्रमाणात घेतली गेली नाही. युरोपात तिथं निश्चित पडणारा पाऊस पिके, गवताळ भाग जिवंत ठेवतो. पूर्णपणाने या पावसानुसारच तिथले पशुपालन विकसित झालेले आहे. भारतात हवामान पूर्णतः भिन्न आहे. विशेष करून पाऊस हा काही सगळ्या ठिकाणी सारखा आणि एकाच वेळेला पडत नाही. प्रत्येक ठिकाणी पडणाऱ्या पावसानुसार लोकसमूहांनी आपापली जनावरे ठेवण्याची पद्धती विकसित केलेली दिसते. उदाहरणार्थ दख्खन पठारावरचे धनगर पावसाळा हा आपापल्या गावात काढतात आणि पावसाळा संपला, की कोकणापर्यंत भटकंती करतात. अशी प्रत्येक लोकसमूहाची जगण्याची वैशिष्ट्यपूर्ण रीत असते.

## स्थानिक की देशी?

भौगोलिक प्रदेशानुसार व लोकांनी केलेल्या निवडीवरून जनावरांच्या या जाती उत्पन्न झालेल्या दिसतात. परिस्थितीनुसार पशुधनातील हवे तसे जुळणारे गुण ओळखून प्रजनन घडवून आणणे ही या लोकांची खासियत आहे. या कलेतून जनावरांच्या विविध जाती जाणीवपूर्वक विकसित केल्या गेल्या आहेत. भौगोलिक प्रदेशानुसार या जाती स्थानिक या व्याख्येखाली मोडतात. त्यानुसार त्यांचा उपयोग केला जातो. या जाती त्या त्या प्रदेशात चांगले उत्पादन देतात आणि टिकतात. आपण स्थानिक आणि देशी यात गफलत करतो. देशी याचा संबंध हा देशाशी किंवा देशीवादाशी जोडण्याची लोक गल्लत करतात. उदाहरण द्यायचे झाले तर सांप्रत काळी देशी गाय म्हणजे मुख्यतः गीर गाय असाच सगळीकडे बोलबोला झाला आहे. गीर ही गाय मूळ गुजरात राज्यातील काठीयावाड या भागातली आहे. तिथली ती स्थानिक जात. मग मराठवाड्यातल्या एखाद्या गावासाठी, विदर्भातल्या एका मोठ्या लोकसमूहासाठी किंवा पश्चिम महाराष्ट्रातल्या अथवा कोकणातल्या पूर्णतः वेगळ्या भौगोलिक प्रदेशासाठी त्या गायीला देशी गाय अशी मान्यता देणे उचित ठरेल का? देशी गायीचे घोडे पुढे दामटताना त्या-त्या प्रदेशातील



(छायाचित्रे : सजल कुलकर्णी)



राजाबाई राठोड (छायाचित्र : इल्से कोहलर-रॉलेफसन)

स्थानिक जाती खिजगणतीतही धरल्या जात नाहीत. शास्त्रीय ज्ञानाची आणि विविधतेची उपेक्षा करून आपापले अजेंडे राबविण्याची हौस हेच मुख्य कार्य म्हणून पुढे येते तेव्हा या अशा गमती होणे अपरिहार्य ठरते. असो.

## जनावरं हाच वारसा

पशूंच्या वेगवेगळ्या जाती पाळणारे लोकसमूह त्यांचे कळप वंशावळीवरून, नावावरून किंवा जागेवरून ओळखतात. त्याचप्रमाणे निवडीच्या निकषांबाबतीतदेखील या लोकांचा कटाक्ष असतो. जनावरांचा आकार, रंग, स्वभाव आणि उत्पादकता या गुणांचा प्रमुख्याने विचार केलेला दिसतो. त्यानुसार वळू, बोकड, रेडे इत्यादींची खरेदी किंवा अदलाबदल केली जाते आणि त्यानुसार प्रजनन केले जाते. अदलाबदल करणे, गुणांची सुसूत्रता पाळणे या गोष्टी अनमानधपक्याने केल्या जात नाहीत, तर त्याच्याही विशिष्ट पद्धती असतात. डांगी जातीच्या संवर्धनामध्ये महत्त्वाची भूमिका असणारे कानडी लोक हे दर वर्षी राजूर येथे खंडोबाच्या यात्रेत एकत्र येतात. तीन दिवस ही यात्रा चालते. त्यातला एक अख्खा दिवस फक्त वळूच्या निवडीसाठी दिला जातो. निवडीच्या वेळी तीन ते चार हजार माणसे रिंगणाभोवती असतात. वळू निवडला जातो. या निवडलेल्या वळूकडून गाय गाभण करून घेण्यासाठी लोक दीड ते दोन हजार रुपये मोजतात. अशा अनेक परंपरा, पद्धती आहेत. देवाच्या नावावर बोकड, रेडा, वळू सोडणे ही अशीच एक पद्धत. जनुकांची, चांगल्या गुणांची, चांगल्या जनावरांची मालकी आणि ती टिकवण्याच्या या अशा पद्धती लोकसन्मुख आहेत. हे काम लोकांच्या हातात ठेवणे यावरच कटाक्ष असायला हवा.

जनावरांच्या जाती आणि त्यांचा अधिवास याबद्दलदेखील हे पशुपालक लोकसमूह खोलवर विचार करतात. त्याबद्दलचे ज्ञान त्यांनी अवगत केलेले दिसते. लाल कंधारी जातीची जनावरे ही मराठवाड्याच्या काही भागांतच का दिसावीत, याबद्दल लोकांशी बोलल्यास हे लक्षात येते, की ज्या ज्या








भागात ही जनावरे आहेत तो भाग हा कठीण दगडांचा आहे. त्या भागात चालायला, काम करायला गोलाकार खूर असलेले जनावर जास्त चांगले. त्यानुसार गोलाकार खुरांची लाल कंधारी जनावरे इथल्या लोकांनी विकसित केली. माणसांचे वनस्पती आणि जनावरांबद्दलचे ज्ञान हे अनुभवातून आलेले आहे. या ज्ञानाचा पशुपालनासाठी उपयोग करणे आणि त्यापुढे जाऊन बाजाराला उपयोगी पदार्थ, उत्पादने बनवणे हेदेखील आपल्याला पाहायला मिळते. जुन्या नंदा गवळी लोकांशी बोलले तर ते सांगतात, की आम्ही पवन्याचे तूप खाल्ले म्हणजे पवन्या गवत खाल्लेल्या गाईच किंवा म्हशीचे तूप. या तुपाला बाजारात जास्त मागणी होती. यावरून असे लक्षात येते, की जनावरे बाळगणारे लोक, त्यांच्या भोवतालचे नैसर्गिक स्रोत आणि बाजार यांचा एकमेकांशी संबंध आहे व त्यानुसार एक घडी बसली आहे.

## झापडबंद विचार सोडा

स्थानिक जनावरे आणि त्यांना पाळणारे लोकसमूह हे परस्परावलंबी आहेत हे स्पष्ट आहे. यासंबंधी आणखी सखोल संशोधन करून त्या आधारे जनावरांच्या संवर्धनाचा कार्यक्रम हाती घेणे ही पुढची दिशा असायला हवी. शाश्वत संवर्धनाचा विचार करायला हवा. यात लोकांना बरोबर घेऊन, त्यांचा अनुभव आणि आधुनिक वैज्ञानिक पद्धती याची सांगड घालणे गरजेचे आहे. जनावरांच्या निरनिराळ्या जाती, त्यांचे गुण-अवगुण याबद्दलची माहिती व संशोधन अजूनही त्रोटक आहे. याकरिता लोकांचा जास्तीत जास्त सहभाग कसा मिळेल, त्यांची मते, अनुभव कसे जाणून घेता येतील, यासाठी प्रयत्न करायला हवेत. त्याच बरोबर शास्त्रज्ञांचा या मंडळींशी नियमित संवाद घडवून आणणे महत्त्वाचे आहे. संशोधन हे केवळ एखाद्या प्रयोगशाळेत किंवा मोठ्या संस्थेतच होते असे मानणे योग्य नाही. हा झापडबंद विचार सोडून देऊन संशोधन हे लोकांबरोबर आणि लोकांसाठी होणे महत्त्वाचे आहे. पशुपालकांच्या नेमक्या गरजा आणि अडचणी जाणून घ्यायला हव्यात. सध्या देशी गायींच्या बाबतीत, कोणत्या का कारणाने का होईना, जागरूकता व आत्मियता वाढीस लागली आहे. ती या दिशेने वळवावी म्हणजे निदान गोसंवर्धनात तरी आपण पुढचे पाऊल टाकले असे म्हणता येईल.





## जैवविविधता कायदा आणि पशुपालक

२००३ ते २००७ या काळात भारत, इटली, इथियोपिया येथे पशुपालक व त्यांचे अधिकार याबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा झाल्या. या चर्चेत आफ्रिका, लॅटिन अमेरिका, आशिया आणि युरोप येथील ५०० प्रतिनिधी सहभागी होते. पशुपालक हे सर्वस्वी एखादी जात तयार करण्यात व एकंदर जैवविविधतेचे संवर्धन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात म्हणून त्याबाबतीतले त्यांचे अधिकार अबाधित ठेवणे हे जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे, असा एकंदर मतप्रवाह या चर्चेतून पुढे आला. त्यानुसार जैवविविधता कायद्यात पशुपालकांच्या हक्कांची तरतूद करण्यात आली; परंतु दुर्दैवाने या कायद्याची अंबलबजावणी हवी तशी झालेली दिसत नाही. हा कायदा खालील मार्गदर्शक तत्त्वे सांगतो.

- पशुपालकांना त्यांच्या स्थानिक जातींच्या प्रजननाविषयी तसेच संवर्धनाविषयी स्वतःहून निर्णय घेण्याचे अधिकार.
- पशुपालनासंबंधी ठरणाऱ्या धोरणांमध्ये पशुपालकांना सहभाग घेण्याचा अधिकार.
- पशुपालनासंबंधी योग्य प्रकारचे प्रशिक्षण, योग्य बाजारपेठ निवडण्यासंबंधीचे अधिकार.
- संशोधनात तसेच संवर्धन कार्यक्रमात सहभागी होण्याचा अधिकार
- पशुपालकांकडे जनावरांविषयी असलेले ज्ञान व माहिती या बद्दलचे अधिकार.

कायद्यानुसार हे अधिकार पशुपालकांना बहाल केलेले आहेत. याबद्दल जाणीव आणि जागरूकता निर्माण झाली पाहिजे. त्यांचा प्रचार आणि प्रसार होणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून पशुपालनात येणाऱ्या समस्या दूर होण्यासाठी मदत होईल.

## जतन-संवर्धन हाच विकास

अतिप्राचीन काळापासून आपल्या देशात बैल शेतीसाठी आणि वाहतुकीसाठी वापरले जातात, त्यामुळे गायी दुधाळ नाहीत. दुधाळ गायींना झालेला खोंड शेतीकामासाठी उपयोगाचा नसतो. युरोपात शेती कामासाठी आणि वाहतुकीसाठी घोडे वापरले जात, त्यामुळे गायी दुधाळ तर बैल मांसाने पुष्ट झाले. मात्र आपल्याकडच्या अनेक जनसमूहांनी गायींच्या विविध जाती सांभाळल्या आहेत. त्यांनी काही दुधाळ जातीही विकसित केल्या. नैसर्गिक निवडीचे तत्त्व त्यासाठी वापरले.

फ्रान्सचे एक पशुतज्ज्ञ मंचर येथील गोवर्धन डेअरीचा प्रकल्प बघायला आले होते. त्यांनी म्हटले, की फ्रान्समध्ये एवढा मोठा चीजचा प्रकल्प काही दिवसांत बंद पडेल. कारण फ्रान्समध्ये विविध गायींच्या वाणांपासून मिळणाऱ्या दुधाचं चीज करण्याची पद्धत आहे. ही विविधता त्यांनी केवळ जतन केलेली नाही तर तिचा विकास केला आहे. तिथे प्रदेशानुसार चीज वेगळे असते.

आपल्याकडील गायी, त्यांचं दूध, त्या दुधाची, त्यापासून होणाऱ्या उपपदार्थांची खासियत काय आहे, त्यांची सामर्थ्यस्थळे कोणती आहेत इत्यादीचा अभ्यास झालेला नाही. अनेक भोळ्या, परंपराप्रिय समूहांनी त्यांच्या गुरांच्या (गायी, म्हैस, रेडे, बकरी) जाती सांभाळल्या आहेत. त्या प्रदेशासाठी आणि हवामानासाठी त्या उत्कृष्ट आहेत. उदाहरणार्थ खिल्लार बैल धानाच्या शेतात काम करायला उपयोगी नसतात. कारण त्यांना चिखल तुडवता येत नाही. तिथे स्थानिक बैलच उपयोगी असतात. या वाणाच्या बैलांच्या त्वचेवर तेल निर्माण करणाऱ्या ग्रंथींची संख्या अधिक असते, त्यामुळे मुसळधार पावसाला वा चिखलाला ते तोंड देऊ शकतात.

आपल्याकडच्या गायींमध्ये परदेशी दुधाळ गोवंशांचे कृत्रिम रेतन करून दुधाळ गायींचे उत्पादन केल्यामुळे श्वेतक्रांती यशस्वी झाली. मात्र त्याचे परिणामही बारकाईने अभ्यासले पाहिजेत. या गायी आपल्याकडच्या हवामानाला उपयुक्त नसतात. त्यांची प्रतिकारशक्ती कमी असते. परिणामी औषधोपचारावर खर्च अधिक होतो आणि दुधाला तर तेवढा भाव मिळत नाही. कृत्रिम रेतन करून पैदास केलेल्या विविध गायींच्या जातींची प्रचंड प्रमाणावर सरमिसळ झाली आहे. त्यामुळे उपचार करणेही अवघड नाही तरी कठीण बनले आहे.

आपल्याकडील दुधाळ गायी-म्हशींच्या स्थानिक जाती हुडकणे आणि त्यांचे पालन करणाऱ्या समूहांचे ज्ञान विकसित करणे, त्यांच्या दुधाला आणि मूल्यवर्धित उत्पादनांना बाजारपेठ विकसित करणे हा या समस्येतून बाहेर पडण्याचा एक मार्ग असू शकतो. कॉन्झर्वेशन म्हणजे जतन-संगोपन-संवर्धन हे स्थितीवादाचे (कॉन्झर्वेटीझम) लक्षण नाही तर खऱ्या अर्थाने तोच विकास आहे. धनगरांनी त्यांच्या मेंढीपालनाच्या, पशुपालनाच्या ज्ञानाचा विकास करायला हवा. त्यातून त्यांचे आर्थिक, सामाजिक प्रश्न



सुटायला हवेत. त्यासाठी त्यांना योग्य संधी आणि एनॅबलिंग वातावरण तयार करण्याची जबाबदारी सरकारीची आहे. या मागणीसाठी धनगर आंदोलन करत नाहीत. त्यांनाही सरकारी नोकरीत आरक्षण हाच विकास वाटतो. हे थोर आहे.

(सजल कुलकर्णी बायफ येथे संशोधन अधिकारी तर डॉ. मेरज सय्यद प्रकल्प अधिकारी आहेत.)
: ९८८१४७९२३९

